Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ११] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २९- मे ५, २०२१/वैशाख ९-१५, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३६.

**अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये दुसरी सुधारित विकास योजनेत फेरबदल करणे.**

क्र. नपवा-नियो.कार्या-१४-१४७-२०२१.—

ज्याअर्थी, वाशिम शहराची दुसरी सुधारित विकास योजना, यापुढे उक्त विकास योजना असेही उल्लेखिलेली शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-४११५-१७९-प्र.क्र.२०६-नवि-३०, दिनांक १२-०९-२०१६ नुसार भागशः मंजूर करण्यात आली असून दिनांक ०६-११-२०१६ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर वाशिम शहराची दुसरी सुधारित विकास योजनामध्ये मौजा वाशिम येथील शेत सर्व्हे नं. ३५१ पैकी ०.०८ हेक्टर जागा आरक्षण क्रमांक २६ पार्कींगसाठी आरक्षित असून नगर परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक १९-८-२०२०, ठराव क्र. ३७३ अन्वये प्रस्ताव पारित करून उक्त जागा आरक्षण क्रमांक २६ पार्कींग मधून वगळून श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरुढ पुतळा उभारण्याकरीता ठराव पारित केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर वाशिम शहराची दुसरी सुधारित विकास योजनामध्ये मौजा वाशिम येथील शेत सर्व्हे नं. ३४२, शिट नं. ६३, सि.स.नं. ६५२ पैकी ०.२० हेक्टर जागा आरक्षण क्रमांक १४१ टाऊन हॉलसाठी आरक्षित असून नगर परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक १८-०२-२०२१ ठराव क्र. ३९९ अन्वये प्रस्ताव पारित करून उक्त जागा आरक्षण क्रमांक १४१ टाऊन हॉल मधून वगळून श्री महात्मा ज्योतीबा फुले व माता सावित्रीबाई फुले यांचे एकत्रिकृत पुतळा उभारण्याकरीता ठराव पारित केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर वाशिम शहराची दुसरी सुधारित विकास योजनामध्ये मौजा वाशिम येथील सर्व्हे नं. ५३५ (भाग), ५३६ (भाग) पैकी ०.२८ हेक्टर जागा आरक्षण क्रमांक ९९ Slaughter House विस्तार करीता आरक्षित असून नगर परिषद, वाशिम ने सर्वसाधारण सभा दिनांक १७-०६-२०१९ प्रस्ताव क्र. २८५ (ब) अन्वये सदर जागा समाज मंदिर (शादी खाना) करीता आरक्षित करण्याबाबतचा ठराव पारित केला आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त फेरबदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा नगर परिषद, वाशिम कार्यालयात कार्यालयीन वेळात नागरिकांना अवलोकनार्थ खुला ठेवण्यात आला आहे.

त्याअर्थी, उक्त फेरबदलाबाबत काही सूचना वा हरकती असल्यास ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत लेखी स्वरूपात नगर परिषद, वाशिम कार्यालयात नोंदवाव्यात. त्यांचा विचार शासनास प्रस्ताव सादर करतेवेळी करण्यात येईल.

**अशोक शंकरलालजी हेडा,**
अध्यक्ष,
नगर परिषद, वाशिम.

वाशिमः
दिनांक १८ एप्रिल २०२१.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३७.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Modification Under Section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No.MCW-DP-Desk-14-147-2021.—

Whereas, Development Plan of Washim (2nd Revised) has been sanctioned by Govt. of Maharashtra State, TPS No. 4115-179-CR-206 (A)-2015-UD-30, dated 12th September 2016 and came into force with effect from 6th November 2016 for the public interest ;

And whereas, the Municipal Council, Washim has decided some modification in the sanctioned 2nd revised Development Plan Washim as follows.--

(1) In the said Development Plan. S.No. 351 (part) area fo 800.00 sq. m. is included as Res. No. 26 for Parking. Municipal Council, Washim *vide* its Resolution No. 373, dated 19-08-2020 has decided to make Modification in Development Plan and proposed that the above said land of 800.00 sq m. shall be deleted from Res. No. 26 for Parking and to be used for Equestrian Statue of Shree Chhatrapati Shivaji Maharaj.

(2) In the said Development Plan, S.No. 342 (part), Sheet No. 63, C.T.S No. 652 area of 0.20 Hectare is included as Res. No. 141 for Town Hall. Municipal Council, Washim *vide* its Resolution No. 399, dated 18-02-2021 has decided to make Modification in Development Plan and proposed that the above said land of 0.20 Hectare shall be deleted from Res. No. 141 for Town Hall and to be used for Combined Statue of Shree Mahatma Jotiba Fule & Mata Savitribai Fule.

(3) In the said Development Plan, S.No. 535(part), 536 (part) area of 0.28 Hectare is included as Res. No. 99 for Slaughter House. Municipal Council, Washim *vide* its Resolution No. 285 (B), dated 17-06-2019 has decided to make Modification in Development Plan and proposed that the above said land of 0.28 Hectare shall be deleted from Res. No. 99 for Slaughter House and to be included in Marriage Hall.

And whereas, the Plan of the proposed Modification has been kept in the office of the Municipal Council, Washim for inspection of the public during office hours.

Now, therefore, any person having objection or suggestion regarding proposed modification may communicate in writing to the Municipal Council, Washim within one month from the date of publication of this notification in Offical Gazatte . It shall be considered by the Municipal Council, Washim before submitting the proposal of modification to Government for sanction.

ASHOK SHANKARLALJI HEDA,
President,
Municipal Council, Washim.

Washim :
Dated the 18th April 2021.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३८.

**प्रशासक, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये मालेगांव शहराच्या प्रारुप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण**

क्र. नपंमा-१२८-२०२१.—

ज्याअर्थी, नगर पंचायत मालेगांवने (यापुढे " उक्त क्षेत्र " असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेली), चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३(१) मधिल तरतुदीनुसार प्रारुप विकास योजना, मालेगांव नगर पंचायत (यापुढे " उक्त प्रारुप विकास योजना " असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा दिनांक ४ जुलै २०१७ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभाग पुरवणी भाग-१ मध्ये दिनांक १३ जुलै २०१७ ते १९ जुलै २०१७ रोजी प्रसिद्ध केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून नगर पंचायत मालेगांवने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहाय्यक संचालक नगर रचना, वाशिम शाखा वाशिम यांची " नगर रचना अधिकारी " म्हणून आदेश क्र. ६८९ दिनांक ७ नोव्हेंबर २०१७ अन्वये नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना, वाशिम शाखा वाशिम यांनी, उक्त अधिनियमातील कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र. १, दिनांक २२ एप्रिल २०२१ रोजी पारित केलेला आहे;

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

(१) मुख्याधिकारी, नगर पंचायत मालेगांव.

(२) सहाय्यक संचालक, नगर रचना, वाशिम शाखा वाशिम.

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत मुख्याधिकारी नगर पंचायत मालेगांव यांच्याकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत नगर पंचायतीकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतले जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन नगर पंचायत मालेगांव कार्यालयात नागरीकांना उपलब्ध होऊ शकतील.

**संदिप महाजन,**
प्रशासक,
नगर पंचायत, मालेगांव.

मालेगांव जहाँगीर :
दिनांक २३ एप्रिल २०२१.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३९.

BY ADMINISTRATOR, NAGAR PANCHAYAT, MALEGAON

PUBLICATION OF DRAFT DEVELOPMENT PLAN OF NAGAR PANCHAYAT MALEGAON UNDER SECTION 26(*1*) OF MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT. 1966.

No. NPM-128-2021.—

Whereas, the Nagar Panchayat Malegaon, (hereinafter referred to as " the said Planning Authority, ") *vide* resolution No. 1(*A*) dated 4th July 2017, had declared its intention to prepare a Draft Development Plan of Nagar Panchayat Malegaon (hereinafter referred to as the " said Draft Development Plan ") for the area under its jurisdiction,

(hereinafter referred to as the said " area ") as per the provision of Section 23(*1*) read with Section 21(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the " said Act ") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division, Supplement Part-1A on 13 to 19th July 2017 ;

And whereas, as per the provision in Section 24 of the said Act, the Nagar Panchayat *vide* Order No. 689 dt. 7th Novermber 2017 has appointed Assistant Director, Town Planning Washim, Branch Washim as " Town Planning Officer " to prepare the said Draft Development Plan for the said area ;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Washim, Branch Washim after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on 15th April 2021 for publication under section 26(*1*) of the said Act ;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 1, dated 22nd April 2021 to publish the said Draft Development Plan under section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/objections from the public ;

Therefore, Nagar Panchayat Malegaon hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

(1) The Chief Officer, Nagar Panchayat Malegaon.

(2) Assistant Director, Town Planning Washim, Branch Washim.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief officer, Nagar Panchayat Malegaon, within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Govt. Gazette.* Suggestions/objections received by the Municipal Council/Nagar Panchayat within the period of the 30 days from the date of publication of this Notice is Maharashtra Government Gazette shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Nagar Panchayat Malegaon.

SANDIP MAHAJAN,
Administrator,
Nagar Panchayat, Malegaon.

Malegaon Jahangir :
Dated the 23rd April 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.